दै. तरुण भारत दि. 04/09/23

# नायगाव पोलिसांच्या कार्यवाहीत पंचवीस हजाराचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, ३ सप्टेंबर -** नायगाव पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारल्यनंतर पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी ठाण्याचा हद्दीतील गुन्हेगार आणि अवैध व्यवसायिक याच्यावर आपल्या कार्यवाहीची जरब बसविल्याने अनेक काळेधंदेवाले भूमिगत झाले असल्याचे पाहायला मिळत असताना कुंटूर ठाण्याच्या हद्दीत विक्रीसाठी नायगावहून दारू नेणाऱ्यास अटक केली आहे.

नायगाव पोलीस ठाण्याच्या धडक कार्यावाह्यांमुळे कुंटूर आणि रामतीर्थ ठाणे चालकांना अडचणीचे जात असून नायगाव ठाणे हद्दीत येजा करणारा काही काळा व्यवसाय थाबल्याने तेही काहीसे हतबल झाल्याचे दिसते.




आज दिनांक ०३ ऑगस्ट रोजी नायगाव पोलीस ठाणे हद्दीत गस्तीवर असताना गोपनीय माहिती मिळाल्याने पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी ठाण्यातील कर्मचारी स्थानिक बीट प्रमुख पो.हे.कॉ मस्तापुरे व त्यांच्या सोबत पो.कॉ. पवार, पो कॉ नांदेवर, पो.कॉ शेरीकर यांना एक इसम बेकायदेशीररित्या दारु वाहतूक करीत सांगितले वरून सादरील कर्मचारी तहसिल कार्यालया जवळ जाऊन, चोरटी वाहतुक करणाऱ्या आटोला थांबाऊन त्याच्या कडे तपासणी केली असता, ऑटोमधे ताकबिड येथील शिवाजी माधव कुरे हा देशी दारूचे १४ बॉटल मिळाल्या

यावरून सादरिल दारु विक्रेत्या विरुद्ध नायगांव पोलीस ठाण्यात कलम ६५(ई)म.दा.का.प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून दारू व आटो असा एकूण २५ हजार नऊशे रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

सदर गुन्ह्याचा तपास पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पो. हे. कॉ मस्तापुरे हे तपास करीत आहेत. नायगाव ठण्याच्या अवैध धंद्याबाबत कार्यवाह्या होत असताना कुंटूर आणि रामतीर्थ पोलिसांनी समोर मात्र धर्मसंकट उभे टाकले आहे.

दै. देशोन्नती दि. 04/09/23

# अवैध दारूची वाहतूक करणाऱ्या ऑटोसह एकास अटक

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नरसी** ▪ अवैधरित्या दारू नायगाव ठाणे अंतर्गत येत असल्याची गोपनीय माहिती नायगाव पोलिसांना मिळाली, त्या अनुषंगाने ३ सप्टेंबर रोजी नायगांव हद्दीत पेट्रोलिंग करत आसताना मिळाल्यावरुन नायगाव पोलिसांनी सदर ऑटो जप्त करुन त्यातील २५ हजार ९८० रुपयांची देशी दारु जप्त केली असून ऑटो ताब्यात घेतला आहे.




चोरट्या मार्गाने अवैधरित्या दारू विकणारा ऑटो नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याची माहिती मिळताच नायगावचे पोनि ओमकांत चिंचोलकर यांनी पो.हे.कॉ मस्तापुरे,पॉपर बीट जमादार सोबत पो.कॉ पवार,पोकॉ नांदेवर,पोकॉ शेरीकर यांनी तहसील कार्यालयाजवळ जाऊन चोरटी वाहतुक करणारा ऑटो थांबऊन त्याच्याकडे अधिक तपासणी केली असता ऑटोतून देशी दारुची वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले. यावेळी पोलिसांनी शिवाजी कुर्ते रा. ताकबीड यास ताब्यात घेतले असून त्याच्याकडून देशी दारुच्या २५ हजार ९८० रुपये किंमतीच्या बाटल्या जप्त केल्या. यामध्ये पोलिसांनी आरोपीसह ऑटो ताब्यात घेतला आहे.

या प्रकरणी सदर इसमाविरुद्ध नायगांव येथे कलम ६५(ई) म.दा. का.प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून दारू व ऑटो असा एकूण २५ हजार ९८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ मस्तापूरे हे करीत आहेत.